पद्मश्री डॉ. विखे पाटील यांच्या स्मरणार्थ दि.१४ ऑगस्ट, २०१९ रोजी राज्यात "शेतकरी दिन" साजरा करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण - २०१९/प्र.क्र. ९६/३-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१९**

**वाचा : -**

१) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय क्रमांक: शेदिजा-२०१२/प्र.क्र.१५०/ ३अे, दि.१६.८.२०१४

२) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/३-अे, दि.२१.८.२०१८

३) संचालक (विस्तार व प्रशिक्षण),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.कृमावि/ विप्र-४/शे.दि./२०१/२०१९, दि.३.५.२०१९

**प्रस्तावना :-**

पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतक-यांकरिता केलेल्या कार्याचे स्मरण व्हावे व राज्यातील सर्व शेतक-यांचा सन्मान म्हणून नारळी पौर्णिमेच्या दिवशी त्यांचा जन्म दिवस शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे स्मरणार्थ शासन निर्णय कृषि विभाग क्र.शेदिजा-२०१२/प्र.क्र. १५०/३अे, दि. १६.८.२०१४ अन्वये दि. २९ ऑगस्ट हा दिवस "शेतकरी दिन " म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर दरवर्षी हा दिवस मराठी तिथीप्रमाणे शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आता सन २०१९ मध्ये दि. १४ ऑगस्ट, २०१९ हा दिवस राज्यात शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर कार्यक्रम छोट्या प्रमाणात साजरा करण्यात यावा. शेतकऱ्यांना ग्रामसभा व अन्य कार्यक्रमाच्या माध्यमातून तांत्रिक मार्गदर्शन व सहाय्य देण्यात यावे.

२. सदर कार्यक्रमासाठी कोणताही अतिरीक्त निधी उपलब्ध करुन देता येणार नाही. या कार्यक्रमासाठी कमीत कमी खर्च आयुक्त, कृषि यांच्या अधिनस्त असलेल्या तरतुदीमधून करावा.

३. शेतकरी दिन साजरा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना कृषि आयुक्तालयाने निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१६२६०९९००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Umesh Narayan Chandiwade

Digitally signed by Umesh Narayan Chandiwade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0a3a08c7339c487fe2836238383bf91bbd037b93b4bdf6c8e95d1969e585fffe, serialNumber=ccbe80fcc6b64503b4e8b1269bd88d631f3f3c2bef6e1ca70cc9a4e30954011f, cn=Umesh Narayan Chandiwade
Date: 2019.08.02 16:35:05 +05'30'

**(उ. ना. चांदिवडे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत-

१) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ / विधान मंडळ ग्रंथालय (१० प्रतीसह)
५) मा. कुलगुरु/कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
६) मा. कुलगुरु/कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
७) मा. कुलगुरु/कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
८) मा. कुलगुरु/कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
९) महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
१०) महासंचालक, माहिती  व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रसिध्दीच्या विनंतीसह (५ प्रती)
११) सर्व  विभागीय आयुक्त
१२) सर्व  जिल्हाधिकारी
१३) सर्व जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४) महालेखापाल ( लेख व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा),  महाराष्ट्र- १ मुंबई, महाराष्ट्र-२ नागपूर.
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ,अकोला
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई
१७) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
१८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१९) कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
२०) सर्व तालुका कृषि अधिकारी
२१) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२) सर्व  सहसचिव / उपसचिव , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२३) रा.कृ.वि.यो कक्ष/ कार्या.२ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२४) वित्त विभाग का.व्यय-१/ अर्थ-१३, नियोजन विभाग १४३१, मंत्रालय, मुंबई-३२
२५) निवडनस्ती (३ अे)